**S.C.C.517/2022**
**CNR NO.MHJG03-000210**
**State Vs. Sunil Ramchandra**

# आरोपीचे प्रतिकथन

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५१७/२०२२ निशाणी क्र. ०३

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २३/०८/२०२२ |
| २. | फिर्याद दाखल करण्याचा दिनांक | :- | २३/०८/२०२२ |
| ३. | फिर्यादीचे नाव | :- | महा. सरकार,अमळनेर पोलीस ठाणे |
| ४. | आरोपीचे नाव | :- | १. सुनिल पुनमचंद भोई,<br>वय- ४८ वर्ष, कामधंदा- रिक्षा चालक,<br>रा.आर.के.नगर, अमळनेर<br>जि.जळगांव. |

५. आरोपीस स्पष्ट केलेला गुन्हयाचा तपशील : -

दि.२३/०८/२०२२ रोजी १६.१० वाजेच्या सुमारास अमळनेर शहरातील बस स्थानकाजवळ भिंतीच्या आडोश्याला सार्व. जागी तुम्ही स्वत:च्या फायदयासाठी अंक आकडयावर लोकांकडुन पैसे स्विकारून कल्याण मटका नावाचा सटटा जुगाराचा खेळ खेळत असतांना रोख र.रू.३५०/- व सटटा जुगाराची साधनासह मिळून आला व त्याद्वारे तुमच्यावर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदयाचे कलम १२ (अ) अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवण्यात येत आहे.

**S.C.C.517/2022**
**CNR NO.MHJG03-000210**
**State Vs. Sunil Ramchandra**

६. <u>आरोपीचे प्रतिकथन</u> : -

प्रश्न १ : - तुम्हाला पोलिस पेपर्सच्या नकला मिळाल्या का ?

उत्तर : - होय.

प्रश्न २ : - तुम्हास तुमचेवर ठेवलेला आरोप वाचून व समजावून सांगितला तो समजला काय ?

उत्तर : - होय.

प्रश्न ३ : - तुम्हाला सरकारकडून वकील पाहिजे आहे का ?

उत्तर : - नाही.

प्रश्न ४ : - तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर : - होय, मला गुन्हा कबुल आहे.

-------------------------
(आरोपीची सही)

समक्ष,

(अमिता यु.यादव)
दि. १३/१०/२०२२. ३रे न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, अमळनेर.

**S.C.C.517/2022**
**CNR NO.MHJG03-000210**
**State Vs. Sunil Ramchandra**

आरोपीस गुन्हयाचा तपशील खुलासेवार त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने स्वतःहून गुन्हयाची कबुली दिली. त्याने त्याला गुन्हा कबुल असल्याबाबतची पुर्शीस नि.क्र.०२ वर दाखल केली आहे. आरोपीने स्वःइच्छेने व कोणत्याही दडपणाखाली न येता सदर गुन्हयाची कबुल दिलेली असल्याचे दिसुन येते. अशा परिस्थितीत, आरोपीची कबुली स्वीकृत करण्यात येते. आरोपीस शिक्षेबाबत त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिली. आरोपी गरीब व त्याच्या घरातील एकमेव कर्ता पुरुष असल्याचे त्याने कथन केले. त्यामुळे, आरोपीने कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती केली. आरोपीचे कथनांचा विचार करता, मी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अन्वये खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी–सुनिल रामचंद्र भोई, वय–४८ वर्ष, कामधंदा– रिक्षा चालक, रा. आर.के.नगर, अमळनेर जि.जळगांव, यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५२ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्याचे कलम १२ (अ) अन्वये दोषी ठरविले असून आरोपीला रक्कम रु.३००/– (अक्षरी रुपये तीनशे मात्र) दंड करण्यात येतो व न्यायालय उठेपावेतो शिक्षा करण्यात येते. आरोपीने दंड न भरल्यास आरोपीस ०५ दिवसांची साधी तुरुंगवासाची शिक्षा ठेवण्यात येते.

२. जप्त मुद्येमाल एकुण रोख रक्कम रु.३५०/– आवाहन कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावी. तसेच जप्त मुद्देमाल सटटा जुगाराची साधन हे निरुपयोगी आणि मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

३. सदर न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस विनाशुल्क देण्यात येते.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AMITA UMASHANKAR YADAV
Date: 2022.11.07 11:19:37 +0530

अमळनेर. (अमिता यु.यादव)
दिनांक : १३/१०/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अमळनेर.
(३ रे कोर्ट)